# नागरिकांची सनद
# जलविज्ञान प्रकल्प (भूपृष्ठ जल), नाशिक

## १.० जलविज्ञान प्रकल्प टप्पा - १:

जलविज्ञान प्रकल्प (भूपृष्ठ जल) टप्पा १ ची सुरूवात जागतिक बॅकेच्या मदतीने (IDA Credit 2774 IN) नोव्हेबर १९९५ पासून झाली. डिसेंबर २००३ मध्ये जलशास्त्रीय माहिती प्रणाली (Hydrological Information System) यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. जलविज्ञान प्रकल्पाचा मुख्य उद्देश संस्था आणि संघटनेमध्ये सुधारणा करणे , तांत्रिक क्षमता वाढविणे तसेच जलहवामान व जलगुणवत्ता विषयक आधारसामग्रीच्या मोजमापात, ती गोळा करण्यात, तीचे पृथ्थकरण, दृढीकरण, साठवणुक व वितरण करण्यात सुधारणा करणे हा आहे. ही आधारसामग्री निरनिराळ्या जलसंपदा व विकास प्रकल्पांच्या मूल्यांकन व नियोजनासाठी वापरली जाते. या प्रकल्पासाठी जागतिक बॅकेने रू. ६३.११ कोटीची आर्थिक मदत दिलेली आहे.राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प टप्पा १ मध्ये भारतातील ९ राज्ये व ६ केंद्रीय संस्थांचा समावेश होता. या प्रकल्पाद्वारे जलहवामान केंद्रांचे जाळे चांगले अद्ययावत उपकरणासहित उभे करण्यात आले.

**प्रकल्पाची उद्दीष्टे :**

- आधारसामग्रीचे संकलन करणे, जलशास्त्रीय माहीतीच्या कामी अचूकता आणणे व सुधारणा करणे.
- संगणकीकरण व संगणक प्रणालीच्या सहाय्याने जलशास्त्रीय माहीतीची साठवण व माहीतीचा अर्थ लावणे, त्यात सुधारणे करणे.
- आधारसामग्रीचे दृढीकरण व पृथ्थकरण करणे, संकलित केलेली आधारसामग्री व क्षेत्रीय विभागाने पुरविलेल्या आधारसामग्रीच्या आधारे नविन प्रकल्पांना पाणी उपलभब्धता प्रमाणपत्र वितरीत करणे
- पुस्तके प्रकाशित करून उपभोक्त्यांना माहीती उपलब्ध करणे.
- नविन हजर झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांना अंतर्गत प्रशिक्षण देणे.

## २.० जलविज्ञान प्रकल्प टप्पा - २

जागतिक बॅकेबरोबर टप्पा २ चा करारनामा १० जाने. २००६ रोजी करण्यात आला. करारनामा ५ एप्रिल २००६ पासून अमलात आला. महाराष्ट्राचा (भूपृष्ठ जल) अपेक्षित खर्च रू.९.८१ कोटी आहे. ह्यामधुन रू.८.७३ कोटी बॅकेकडून मिळणार आहेत. प्रकल्पाचा कालावधी ६ वर्षे आहे. जलशास्त्रीय अभ्यास राष्ट्रीय जलविज्ञान संस्था, रूरकीच्या सहाय्याने करावयाचे आहेत. या प्रकल्पात भारतातील १३ राज्ये व ९ केंद्रीय संस्थांचा समावेश आहे.

**जलविज्ञान प्रकल्प टप्पा २ ची उद्दीष्टे**

१) संस्थेचे सबलीकरण
- टप्पा १ कामांचे सक्षमीकरण
- साक्षरता, वितरण व माहीतीची देवाणघेवाण
- माहीती व अनुभवांची आंतरसंस्था देवाणघेवाण

२) उर्ध्व विस्तार
- हायड्रॉलॉजिकल डीझाईन एडस् तयार करणे
- डीसिजन सपोर्ट सिस्टीम तयार करणे
- पर्पज ड्रीव्हन स्टडीज हाती घेणे

३) समांतर विस्तार
- नवीन राज्ये व केंद्रीय संस्थांसाठी लागू आहे.

## ३.० पाणी उपलब्धता प्रमाणपत्र

जलविज्ञान प्रकल्पाकडे विश्वासार्ह व गुणवत्तापूर्ण जलहवामान विषयक आधारसामग्री जमा झाल्याने आणि जलशास्त्रीय माहीती प्रणाली मध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ, टप्पा १ मध्ये विविध संगणक प्रणाली उपलब्ध झाल्याने त्याचा वापर करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने ५ द.ल.घ.फू. (१५० ह.घ.मी.) पेक्षा अधिक क्षमतेच्या सर्व प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्याचे काम मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नासिक यांचेकडे सोपविलेले आहे. नवीन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी हे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

## ४.० जलविज्ञान प्रकल्पाची प्रशासकीय रचना

| *मंजूर आस्थापना* | |
|---|---|
| मुख्य अभियंता | १ |
| अधिक्षक अभियंता | २ |
| कार्यकारी अभियंता | ९ |
| उपविभागीय अभियंता | ४८ |
| सहाय्यक अभियंता २ / शाखा अभियंता | १७९ |
| स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | १०४ |
| इतर - | ४४५ |
| एकूण - | ७८८ |




## ५.० जलविज्ञान प्रकल्पातील जलहवामान आधारसामग्री संकलन करण्याची पद्धत

- पर्जन्यमान - प्रत्येक तासाला (स्वंयचलित), दिवसातून एकदा (साधे),
- कमाल व किमान तपमान - दिवसातून २ वेळा
- शुष्क व आर्द्र तपमान - दिवसातून २ वेळा
- मोजपात्रातील पाण्याचे बाष्पीभवन - दिवसातून २ वेळा
- बाष्पीभवन मोजपात्रातील पाण्याचे तपमान - दिवसातून २ वेळा
- सापेक्ष आर्द्रता - दिवसातून २ वेळा
- वा-याचा वेग - दिवसातून २ वेळा
- वा-याची दिशा- दिवसातून २ वेळा
- सूर्यप्रकाशाचा कालावधी - प्रत्येक तासाला

- नदीमधील पाण्याचा पातळी - प्रत्येक तासाला (स्वंयचलित), दिवसातून २ वेळा, दिवसातून ४ वेळा, इ. (स्टाफ)
- नदीमधील पाण्याचा विसर्ग - दिवसातून २ वेळा

## ६.० महाराष्ट्रातील जलहवामान विषयक केंद्रांचे जाळे

| अ.क्र. | प्रकार/विभाग | पुणे | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | ठाणे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पर्जन्य मापन केंद्रे (साधे) | १२८ | १८४ | ७२ | ६५ | ९४ | ५४३ |
| २ | पर्जन्य मापन केंद्रे (स्वयंचलित) | ३२ | ३१ | ४० | ४५ | ८६ | २३४ |
| ३ | हवामान केंद्रे | ४५ | ३४ | १३ | ३४ | २६ | १५२ |
| ४ | सरिता मापन केंद्रे | ५२ | ४१ | ४१ | ५१ | ६७ | २५२ |
| ५ | जलगुणवत्ता प्रयोगशाळा स्तर १ | ४ | ६ | ८ | १२ | ८ | ३८ |
| ६ | जलगुणवत्ता प्रयोगशाळा स्तर २ | २ | २ | ० | १ | ० | ५ |
| ७ | जलगुणवत्ता नमुना संकलन केंद्रे | ३३ | २५ | १८ | १७ | ३४ | १२७ |
| ८ | प्रवाहातील गाळ नमुना संकलन केंद्रे | ५० | २७ | २६ | १२ | ४ | ११९ |

## ७.० जलविज्ञान प्रकल्पातर्फे प्रकाशित करण्यात आलेली पुस्तके

जलविज्ञान प्रकल्पातर्फे दरवर्षी जलपुस्तिका प्रकाशित केली जाते. आतापर्यंत २००२-२००३ ते २००६-२००७ या वर्षांच्या जलपुस्तिका प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. तसेच जलविज्ञान प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या केंद्राची माहिती पुस्तिका प्रकाशित करण्यात आलेली आहे.

## ८.० जलशास्त्रीय आधारसामग्री उपभोक्ता गट

सार्वजनिक स्त्रोतांचा इष्टतम वापर व्हावा यासाठी उपभोक्त्यांच्या आधारसामग्रीविषयक गरजा व जलशास्त्रीय माहिती प्रणालीचे नियम यात समन्वय असणे आवश्यक आहे. जलशास्त्रीय माहिती प्रणालीद्वारे पुरविण्यात येणारी माहिती सतत मागणीनुसार असावी, यासाठी जलविज्ञान प्रकल्प , महाराष्ट्र तर्फे आधारसामग्री उपभोक्ता गटाची स्थापना करण्यात आली आहे.

**जलशास्त्रीय आधारसामग्री उपभोक्ता गट स्थापनेची उद्दीष्टे**

- आधारसामग्री पुरविणारे व आधारसामग्रीचा उपयोग करणारे यांना समान व्यासपीठ उपलब्ध करणे
- उपभोक्त्यांना जलशास्त्रीय माहिती प्रणालीविषयी माहिती उपलब्ध करून देणे.
- उपभोक्त्यांच्या आधारसामग्री विषयक बदलत्या गरजांची माहिती समजून घेणे, अद्दयावत करणे व त्याचे विश्लेषण करणे.
- आधारसामग्रीच्या जाळयामध्ये वाढ करणे किंवा ते कमी करणे याबाबत पुर्नविलोकन करणे व शिफारस करणे.

जलशास्त्रीय माहितीचा लाभ विविध संस्था घेत आहेत. यामध्ये जलसंपदा विभाग, पाणी पुरवठा विभाग, जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, रेल्वे, वन विभाग, प्रदूषण नियंत्रण विभाग, खाजगी संस्था, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी व शास्त्रज्ञ, राज्य व केंद्रस्तरीय संस्था इ.चा समावेश आहे.

जलहवामान विषयक आधारसामग्री फक्त उपभोक्ता गटाच्या सदस्यांनाच देण्यात येते. जलहवामान विषयक आधारसामग्री उपभोक्ता गटाचे सभासदत्व सर्वांना खुले असून सभासद, रू.५००/- फी भरून होता येईल. हे सभासदत्व ५ वर्षांसाठी वैध राहील व नंतर त्याचे नुतनीकरण करता येईल. रू.२५००/- फी भरून आजीवन सदस्य होता येते.

उपभोक्त्यांसॉ आधारसामग्री सशुल्क वितरीत करण्यात येते. आधारसामग्रीचे दर व त्यामधील सवलत , सदस्यत्व नोंदणी व आधारसामग्री मागणीपत्र ई. बाबत संस्थेची माहीती **www.mahahp.org** या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

## ९.० जलविज्ञान प्रकल्प संपर्कासाठी पत्ते

१. मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प,
जलविज्ञान भवन, दिंडोरी रोड, नाशिक
४२२००४
☎ ०२५३/२५३०२२७
✉ cehp.nashik@mahahp.org

२. अधिक्षक अभियंता, जलविज्ञान प्रकल्प मंडळ (संकलन), जलविज्ञान भवन, दिंडोरी रोड, नाशिक ४२२००४
☎ ०२५३/२५३२९७२
✉ sehpcc.nashik@mahahp.org

३. अधिक्षक अभियंता, जलविज्ञान प्रकल्प मंडळ (पृथ:करण), जलविज्ञान भवन, दिंडोरी रोड, नाशिक ४२२००४
☎ ०२५३/२५३२४०८
✉ sehpca.nashik@mahahp.org

४. कार्यकारी अभियंता, जलहवामान आधारसामग्री प्रक्रीया विभाग, जलविज्ञान भवन, दिंडोरी रोड, नाशिक ४२२००४
☎ ०२५३/२५३२९६४
✉ eehdpd.nashik@mahahp.org

५. कार्यकारी अभियंता
जलविज्ञान प्रकल्प विभाग,गजानन महाराज मंदिराजवळ,गारखेडा रोड,
औरंगाबाद-४३१००५
☎ ०२४०/२४४१४२८
✉ eehpd.aurangabad@mahahp.org

६. कार्यकारी अभियंता,
जलनियोजन विभाग, जलविज्ञान भवन, सिडीओ-मेरी आवार, दिंडोरी रोड, नाशिक ४२२००४
☎ ०२५३/२५३२९६४
✉ eewpd.nashik@mahahp.org

७. राज्यस्तरीय आधारसामग्री साठवण केंद्र, जलविज्ञान प्रकल्प, जलविज्ञान भवन, दिंडोरी रोड, नाशिक ४२२००४
☎ ०२५३/२५३३४७७
✉ sdsc@mahahp.org

८. कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, जुने विभागीय आयूक्त कार्यालय, अमरावती-४४४६०२
☎ ०७२१/२६६२८२६
✉ eehpd.amaravati@mahahp.org

९. कार्यकारी अभियंता,
जलविज्ञान प्रकल्प विभाग, जलसंपदा भवन, वैनगंगा वसाहत, अजनी नागपूर.४४०००३
☎ ०७२२/२५६१५२७
✉ eehpd.dnagpur@mahahp.org

१०. कार्यकारी अभियंता,
जलविज्ञान प्रकल्प विभाग, जी बॅरेक, मध्यवर्ती इमारत पुणे-४११००१.
☎ ०२०/२६१२६९१८
✉ eehpd.pune@mahahp.org

११. कार्यकारी अभियंता,
जलविज्ञान प्रकल्प विभाग, जुना मुंबई-पुणे महामार्ग, कळवा-ठाणे ४००६०५
☎ ०२२/२५४२६०९३
✉ eehpd.thane@mahahp.org

१२. कार्यकारी अभियंता,
खोरे समरूपण विभाग, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे
☎ ०२०/२६०५५४३५
✉ eebcd.pune@mahahp.org